# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## वार्षिक अहवाल नियमित कार्यक्रम 2022-23

**1) कार्यक्रमाधिका-याची कार्यशाळा**

राजर्षी शाहू महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्यासंयुक्तविद्यमाने दि. ०९.०५.२०२२ रोजी कम्युनिटी बेसड पार्टिशिपेटरी रिसर्च (**CBPR**) व राष्ट्रीय सेवा योजना या विषयावर एकदिवसीय विभागीय कार्यशाळा अयोजित करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ३६ कार्यक्रमाधिकारी व २४ विद्यार्थी स्वयंसेवक प्रतिनिधी सहभागी झाले. या कार्यशाळेचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. भोसले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी अध्यक्षस्थान भूषवले. सहभागी कार्यक्रमाधिका-यांना मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली येथील सीबीपीआरचे समन्वयक डॉ. राजेश टंडन यांनी अभाषी पध्दतीने मार्गदर्शन केले. त्याचबरोबर महाविद्यालयातील सीबीपीआरच्या समन्वयक प्राध्यापीका डॉ. अनुजा जाधव यांनी साधनव्यक्ती म्हणून उपस्थित सर्व कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक प्रतिनिधी यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याण सावंत यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ सचिन भंडारे यांनी केले

**2) Eat Right India Walkathon मध्ये सहभाग (दि. ०१ मे २०२२)**

फुड सेफ्टी अॅण्ड स्टॅण्डर्ड अथोरेटी ऑफ इंडिया द्वारा आयोजित व्याकॅथॉनमध्ये महाविद्यालयातील १४० विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवत दयानंद महाविद्यालय लातूर ते राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर इथपर्यंत पायी चालत आहाराच्या सवयींविषयी व सकस आहाराविषयी घोषवाक्य देत जनजागृती केली. या कार्यक्रमाचा समारोप दयानंद महाविद्यालय, लातूर येथील मैदानात झाला. या कार्यक्रमाध्ये कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे व १४० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

**3) शाहू महाविद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी:(11 एप्रिल 2022)**

दिनांक ११ एप्रिल २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे महाराष्ट्रातील भारतीय सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, अस्पृश्यता, जातिव्यवस्थेचे निर्मूलनकार, स्त्रियांना आणि मागास जातीच्या लोकांना शिक्षण मिळवून देणारे थोर समाजसुधारक आणि 'शेतकऱ्यांचा असूड', 'गुलामगिरी' चे लेखक महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व भारत स्काऊट गाईड चे युनिट लीडर प्रा. विजय गवळी व ग्रंथपाल डॉ. एस.बी. मस्के यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा प्रकाश टाकत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कु. सय्यद नूर हिने आपले विचार मांडले. महाविद्यालयाचे सहाय्यक ग्रंथपाल श्री.पांडुरंग भोगीले, सावंत मैडम, श्री धनु राठोड, श्री हरिश बंडगर, व राष्ट्रीय सेवा योजना आणि स्काऊट गाईड चे विद्यार्थी उपस्थित होते.

**4) शाहू महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण)**

लातूर दिनांक 14 एप्रिल 2022

राजर्षी शाहू (स्वायत्त) महाविद्यालय , लातूर येथे एन.एस.एस. आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 131 वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी ऋषिकेश

गायकवाड, अनिकेत गायकवाड ,राकेश आदमाने यांनी भिमगिताने कार्यक्रमाचा आरंभ केला. या प्रसंगी अक्षित हेरकर, आदित्य दराडे व प्रिया मोरे यांनी भाषण व काव्यातून आंबेडकरांच्याविचारांची प्रासंगिकता मांडली.

या कार्यक्रमा प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना व रेडरिबन क्लब यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित युवा दिनानिमित्त HIV व Covid-19 जनजागृती निमित्त घेण्यात आलेल्या व्हिडिओ क्लिप निर्मिती स्पर्धेतील चि. रणवीर धर्मराज हल्लाळे याने प्रथम क्रमांक पटकावले. कु.साक्षी बजुळगे हिने द्वितीय तर कु.आर्शिया शेख व कु.मनियार खलील यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केले., पोस्टर मेकिंग स्पर्धेत कु. नेहा जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावले तर कु. श्रद्धा जाधव हिने द्वितीय आणि कु. साक्षी कुलकर्णी व कल्याणी बिराजदार यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केले. मास्क डिझायनिंग स्पर्धेत कु. मनियार सानिया खलील हिने प्रथम क्रमांक पटकावले तर कु.निलम पठाण व कु. श्रद्धा घुटे यांनी क्रमशः द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले. नेताजी सुभाषचंद्रबोस यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व भारत स्काऊट गाईड विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या ऑनलाईन भाषण स्पर्धेत चि.अक्षित हेरकर याने प्रथम क्रमांक पटकावले तर कु.प्रिया मोरे, चि. आदित्य दराडे यांनी द्वितीय व कु आकांक्षा लांडगे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केले. या सर्व विजेत्यांनां कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.विजय अशोक गवळी यांची लातूर जिल्हा रासेयो चे समन्वयक म्हणून निवड झाल्यामुळे त्यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी डॉ. बाबासाहेबांनी स्वातंत्र्या पेक्षा समता अधिक महत्वाची आहे. ही बाब प्रकर्षाने मांडली तसेच बाबासाहेब परदेशात शिकून भारतीयांच्या विकासासाठी सगळी हयात येथे खर्च केली पण आजचे भारतीय युवक भारतात शिक्षण घेतात आणि परदेशात सेवा देतात असे मत मांडले. कलम 370 ला विरोध करणारे बाबासाहेब पहिले व्यक्ती होते तर हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले व राज्यघटनेचे अनेक भारतीय भाषामध्ये भाषांतर करण्याचे हि काम त्यांनी केले असे मत त्यांनी मांडले.

या प्रसंगी उप.प्राचार्य एस.एन.शिंदे, परीक्षा नियत्रंक ओ. व्ही. शहापूरकर, उप. प्राचार्य सुचेता वाघमारे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. अभिजीत यादव,कार्यक्रमाधिकारी डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी , प्रा. सोमदेव शिंदे तसेच विद्यार्थी स्वयंसेवक विष्णू चव्हाण, शुभम व्यवहारे, शुभम पोफळघट, माया सोनकांबळे, निकिता कदम, महेक अन्सारी, सूरज मुळे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**5) शाहू महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा**

दिनांक 21 जून 20222 रोजी पतंजली योग समिती, लातूर व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील क्रीडा विभाग, हेल्थ ॲन्ड वेलनेस समिती व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. या योग प्रशिक्षण शिबीरात डॉ. शाहूराजे औताडे यांनी महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना योग प्रशिक्षण दिले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. अनिरुद्ध बिराजदार, डॉ. स्वाती फेरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**6) शाहूतील कर्मचाऱ्यांसाठी एल.पी. जी. वापर व सुरक्षेसंदर्भातकार्यशाळा दिनांक 29 जून 2022**

दिनांक 29 जून 2022 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने उज्वला गैस योजनेचा प्रचार प्रसार करण्यासाठी तसेच गैस सुरक्षा अभियान अंतर्गत महाविद्यालयातील शिक्षक

शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या करिता एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये सूर्या गॅस एजन्सी चे फील्ड मॅनेजर श्री गजानन टोलपे यांनी साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये त्यांनी अनेक प्रात्यक्षिके करून दाखवत लिक्विड पेट्रोलियम गॅस वापर करतांना होणारे गैस लिकेज् व त्यापासून होणाऱ्या संभाव्य दुर्घटनाव गैस संदर्भातील धोके आणि सुरक्षा याची माहिती महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना करून दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांची तर उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्य प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांची कार्यक्रमात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याण सावंत यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले.

**7) राजर्षी शाहू महाविद्यालयात Covid-19 प्रतिबंधात्मक बुस्टर डोस लसीकरण मोहीम**
**लातूर दि. 18/07/2022 ते 21/07/20222**

लातूर महानगरपालिका अंतर्गत नागरी आरोग्य केंद्र बौद्ध नगर व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने Covid-19 प्रतिबंधात्मक बुस्टर डोस चे लसीकरण मोहीम दिनांक 18/07/2022 रोजी राबविण्यात आली. यावेळी 118 लाभार्थ्यांना कोविशिल्ड व 48 लाभार्थ्यांना कोवॅक्सीन असे एकूण 166 लाभार्थ्यांना बुस्टर डोस ची लस टोचून लसीकरण करण्यात आले. या नंतर 21 जूलै 2022 पर्यंत हे लसीकरण अभियान राबविण्यात आले. व अनेक लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्य सौ. सुचेता वाघमारे, परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. नासाहेब काळे, डॉ. अनिरुद्ध बिराजदार, प्रा. रत्नराणी कोळी, नागरी आरोग्य केंद्र बौद्ध नगर चे मलेरिया डॉ. आडे.आर.एल., ए.एन.एम.सौ.गोरटे आर. व्ही, सौ. शारदा गायकवाड, आशा वर्कर सौ. हाणमंते, डेटा ऑपरेटर श्री तेजस मदने, कु. सुरक्षा कोल्हे इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

**8) वृक्षारोपण पूर्वतयारीसाठी बैठकीत कार्यक्रमाधिकारी यांची उपस्थिती**

दिनांक 06 जुलै 2022 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे वेगवेगळ्या महाविद्यालयातील प्राचार्य / प्रशासकीय अधिकारी यांची मांजरा नदी काठावर वृक्षलागवड अभियान पूर्वतयारीसाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हाधिकारी मा. बी.पी. पृथ्वीराज यांनी मार्गदर्शन केले. शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इ.उपस्थित होते. तसेच दिनांक 16 जुलै 2022 रोजी वृक्षारोपण पूर्वतयारीसाठी सोनवती व भातखेडा गावात बैठक घेण्यात आली या बैठकीत जिल्हा प्रशासनाचे कर्मचारी, गावातील सरपंच, ग्रामसेवक, नागरिक व राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इ. उपस्थित होते. व 19 जुलै 2022 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे वेगवेगळ्या महाविद्यालयातील प्राचार्य / प्रशासकीय अधिकारी यांची वृक्षारोपण पूर्वतयारीसाठी बैठक घेण्यात आली. दिनांक 23 जूलै 2022 रोजी भातखेडा येथे बैठक घेण्यात आली. जिल्हा प्रशासनाचे कर्मचारी, गावातील सरपंच, ग्रामसेवक, नागरिक व राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, इ.उपस्थित होते.

**9) मांजरा नदीच्या काठावर भातखेडा व सोनवती गावात एकाच वेळी 4000 वृक्ष रोपांची लागवड दिनांक 24 जुलै 2022 रोजी**

जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांच्या वतीने भारतीय स्वतंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वेगवेगळ्या गावांमध्ये मांजरा नदी काठावर दिनांक 24 जुलै 2022 रोजी सकाळी 11:15 वा. एकाच वेळी 28000 वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित केला. जिल्हाधिकारी कार्यालय लातूर व राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यासंयुक्तविद्यमाने सदर दिवशी सकाळी 11:15 वा. एकाचवेळी 'भातखेडा' गावातील मांजरा नदी काठावर 2000 व 'सोनवती' गावातील मांजरा नदी काठावर 2000 असे एकूण 4000 वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी स्वयंसेवकांसोबतवेगवेगळ्या विभागातील 1275 विद्यार्थ्यांनी व 75 पेक्षा जास्त प्राध्यापक, शिक्षकांनी सहभाग नोंदविला. या उपक्रमात दोन्ही गावातील नागरिकांनी ही सहभाग नोंदविला. सदर अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर च्या प्रशासकीय कर्मचारी यांच्या बरोबर महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा.विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक यांनी विशेष परिश्रम घेतले.

**10) वृक्षारोपण**

दिनांक २८ जुलै २०२२ रोजी *राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.श्री विजय अशोक गवळी यांनी शिक्षक कॉलनी, त्रिनेत्रेश्वर मंदिर रोड, शिक्षक कॉलनी, बाभळगाव चौक, लातूर येथे दोन वृक्षरोपांची लागवड केली.

**11) स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ध्वजारोहण व "हर घर तिरंगा जनजागृती अभियान"**

दिनांक 13 ऑगस्ट 2022 ते 15 ऑगस्ट 2022 राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील 'राष्ट्रीय सेवा योजना' व 'एन.सी.सी.' व 'स्काउट गाइड विभागाच्या' संयुक्त विद्यमाने "हर घर तिरंगा जनजागृती अभियान" कार्यक्रम राबविण्यात आले. या अभियानात दिनांक 13 ऑगस्ट 2022 रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांनी ध्वजारोहण केले. यानंतर 'राष्ट्रीय सेवा योजना' व 'एन.सी.सी.' व 'स्काउट गाइड विभागाच्या' संयुक्त विद्यमाने "हर घर तिरंगा जनजागृती अभियान" जनजागृती साठी रॅली काढण्यात आली. दिनांक 14 ऑगस्ट 2022 रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर चे सदस्य व लोकमत वृत्तपत्राचे संपादक श्री धर्मराज हल्लाळे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. व दिनांक 15 अगस्त 2022 रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर चे सदस्य श्री. आनंद माने यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्य सुचेता वाघमारे, परीक्षा नियंत्रक डॉ.ओमप्रकाश शहापूरकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**12) एक विद्यार्थी, तीन वृक्षारोप लागवड अभियान"**

दिनांक 15 ऑगस्ट 2022 ते शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयो विभागातर्फे महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी "एक विद्यार्थी, तीन वृक्षारोप लागवड अभियान" राबविण्यात आले. या अभियाना सक्रिय सहभागी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणासाठी तीन खड्डे खोदणे व त्यात तीन वृक्षारोप लागवड करुन त्यागे जीओ टॅग फोटो काढून पर्यावरण शिक्षण व मूल्यशिक्षण वहीत सदर फोटो चिटकवण्यास आवाहन करण्यात आले. याची अमलबजावनी करत इयत्ता 11वी व 12वी कला, वाणिज्य व एच.एस.सी.व्होकेश्नल शाखेतील 75% पेक्षा जास्त म्हणजे 1450 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी वृक्षारोप लागवड करुन "पर्यावरण शिक्षण व जलसुरक्षा" या विषयाच्या प्रकल्प अहवाल वही मध्ये तीन खड्डे खोदल्याचे व तीन वृक्षारोप लागवडीचे असे 6-6 फोटो चिटकविले.

वया वृक्षलागवड अभियानाला यशस्वी करण्यासाठी योगदान दिले. सदर अभियान यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**13) वैभव कांबळे या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयातील रासेयो विभागास 50 वृक्षरोप भेट**

दिनांक 13 सप्टेंबर 2022 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील इयत्ता 11वी कला या वर्गात शिकणारा विद्यार्थी चि. वैभव कांबळे या विद्यार्थ्यांने त्याच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागास 50 वृक्षरोप भेट दिले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व रासेयो चे विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

**14) दुचाकी गाड्यांचा वापर व सतर्कता* या विषयावर जनजागृती कार्यक्रम**

दिनांक 14 सप्टेंबर 2022 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "दुचाकी गाड्यांचा वापर व सतर्कता" या विषयावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. गाडी चालवताना हेल्मेट वापरले पाहिजे. योग्य स्पीड ने गाडी चालवली पाहिजे. याबाबत मार्गदर्शन या कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**15) मानवाच्या भवितव्यासाठी वृक्ष लागवड करणे अत्यावश्यक - माजी आमदार पाशा पटेल शाहू महाविद्यालयात रासेयो स्थापना दिवस "वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन: काळाची गरज" या विषयावर व्याख्यान**

लातूर: दिनांक 24 सप्टेंबर 2022 पृथ्वीतलावरील वाढत्या वृक्षतोडीमुळे औष्णिक ऊर्जा निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या दगडी कोळसा द्वारे वाढत्या कार्बन उत्सर्जनामुळे जागतिक स्तरावर दिवसेंदिवस तापमान वाढत चाललेले आहे. येत्या 28 वर्षानंतर म्हणजे वर्ष 2050 पर्यंत मानवजात व सजीवसृष्टी धोक्यात येऊ शकते. म्हणून भावी पिढीला वाचवण्यासाठी झाडे लावणे गरजेचे आहे. असे मत माजी आमदार पाशाभाई पटेल यांनी NSS च्या स्थापना दिनानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयात व्यक्त केले. शिवछत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालय(स्वायत्त), लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 24 सप्टेंबर या NSS च्या स्थापना दिनानिमित्त "वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन: काळाची गरज" या विषयावर व्याख्यानाचे कार्यक्रम संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते.

पुढे बोलताना माजी आमदार पाशा पटेल म्हणाले की, शाहू महाविद्यालयाने शैक्षणिक उपक्रमासोबतच वृक्षारोपणाचा एक नवा पॅटर्न निर्माण केला आहे आणि भारतातील सर्व नद्यांच्या काठावर वेगवेगळ्या महाविद्यालयातील युवकांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करुन हा वृक्षलागवडीचा हा शाहू पॅटर्न संपूर्ण देशात पोहचणार आहे. असेही ते म्हणाले.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 75000 वृक्षारोपांची लागवड केली जात आहे. असे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांनी सांगितले डॉ. अनुजा जाधव यांनी मुल्यशिक्षण या विषयावर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी आपले सामाजिक शैक्षणिक व कर्तव्याचे भान ठेवून कार्य करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमात मंचावर प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, सामाजिक कार्यकर्ते श्री अच्युतराव गंगणे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता त्रिमुखे, प्रा.विजय गवळी इत्यादी व सभागृहात मोठ्या संख्येने इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.कल्याण सावंत, सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.विजय गवळी यांनी केले.

**16) शाहू महाविद्यालयाने 'साखरा' वनक्षेत्रात 16 एकर जागेवर केली 7000 वृक्षरोपांचीलागवड**

दिनांक 25 सप्टेंबर 2022 राजर्षी शाहू महाविद्यालयातील मूल्यशिक्षण अभ्यासक्रम व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक 25 सप्टेंबर 2022 रोजी ता. जि. लातूरच्या मौजे - साखरा गावातील वन क्षेत्राच्या 16 एकर जागेवर 7000 वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. या वृक्ष लागवड अभियानामध्ये शाहू महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील 1250 विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शिव छत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचलित राजर्षी शाहू महाविद्यालय(स्वायत्त), लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या दीड-दोन वर्षांमध्ये 75000 वृक्षलागवडीचे संकल्प केलेला आहे. महाविद्यालयांने सातत्याने वेगवेगळ्या ठिकाणी आतापर्यंत 20000 वृक्षरोपांचीलागवड केलेली आहे.

लातूर मधील जंगल क्षेत्राचे प्रमाण 1% पेक्षा कमी आहे. म्हणूनच लातूरच्या जंगल क्षेत्राचे प्रमाण वाढवण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गांभीर्यपूर्वक दखल घेत मूल्यशिक्षणाचे धडे गिरवणाऱ्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन मौजे साखरा गावाच्या पूर्वेला जे 16 एकर चे वनक्षेत्राची रिकामी जागा पडून होती. या वन क्षेत्राच्या जागेत पिंपळ, आंबा, चिंच, सीताफळ, कडू लिंब, साग, करंज, जांभूळव इतर अनेक प्रजातींच्या झाडांच्या वृक्षरोपण ची लागवड करण्यात आली. लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. बी.पी. पृथ्वीराज यांनी स्वतः एक वृक्षरोप लागवड करत मौजे साखरा येथील वनक्षेत्रात वृक्ष लागवड कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

सदर वृक्ष लागवड अभियान यशस्वी करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, मूल्यशिक्षण अभ्यासक्रम कमिटीचे चेअरमन डॉ.अनुजा जाधव, आयक्युएसी को-ऑरडिनेटर डॉ. अभिजित यादव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, वृक्ष लागवड समन्वय समितीचे सदस्य प्रा.विजय दळवी, प्रा. सुर्यकांत चव्हाण, प्रा. किशोर शिंदे, प्रा. चंद्रशेखर दवने, डॉ.अर्चना टाक, प्रा. सायली समुद्रे, प्रा. व्यंकट धुमाळ, डॉ. निशांक पिंपळे, डॉ.संदीपान हाडुळे, प्रा. माधव शेळके, प्रा.नितीन पांचाळ, प्रा. प्रमोद जैन, प्रा. वैभव माने, प्रा. अर्चना रणदिवे, प्रा. विश्वनाथ पांचाळ, प्रा. रियाज शेख, प्रा.ज्योती माशाळकर, प्रा.श्रद्धा जाधव, प्रा. प्रशांत जोशी, प्रा.चेतना आहाळे, प्रा. शुभम जाधव प्रा. चंद्रप्रभा कुलकर्णी व इतर प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व वृक्ष प्रतिष्ठान चे सदस्य अनिल वारद ,अरिहंत , मस्के , लक्ष्मण , अनिता देशपांडे , कविता सावंत , बिराजदार मॅडम , बालाजी जोशी यांनी विशेष प्रयत्न केले.

**17) राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबीरात शाहू च्या विद्यार्थीनीचा सहभाग**

दिनांक २८ ते ३० सप्टेंबर २०२२ दरम्यान "राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबीर" शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पार पडला या शिबिरात राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील वरिष्ठ महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व जिल्हा समन्वयक डॉ. कल्याण सावंत व विद्यार्थी स्वयंसेवक श्याम बैनबोने, मगर अभिजित, कदम निकिता व कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची विद्यार्थ्यांनी

स्वयंसेविका कु. बोयने निकिता नारायण (इयत्ता १२वी कला) हिने सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर चे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, लातूर विभाग, लातूर रासेयो + चे विभागीय समन्वयक डॉ. संदीप जगदाळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**18) राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री**

**दिनांक 02 ऑक्टोबर 2022** राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, ग्रंथपाल श्री.एस.बी. मस्के, ग्राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय अशोक गवळी, सेवक श्री गोविंद जाधव, श्री धनु राठोड व इतर उपस्थित होते.

**19) मा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बाभळगाव रोड येथे वृक्षारोपण**

**दिनांक 03 ऑक्टोबर 2022** शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आज दिनांक 03 ऑक्टोबर 2022रोजी 'महाराणा प्रताप नगर, बाभळगाव रोड, लातूर' या ठिकाणी 93 वृक्षरोपांचीलागवड करण्यात आली. यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. शुभम जाधव व 47 विद्यार्थी स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

**20) शाहू महाविद्यालयात 'नो व्हेईकल डे' साजरा**

दिनांक 11 ऑक्टोबर 2022 रोजी पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दिनांक रोजी नो वेहिकडे साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी सदर दिवशी कोणीही चार चाकी किंवा दुचाकी वाहन महाविद्यालयात आणले नाही. महाविद्यालयात येण्यासाठी सर्वांनी यावेळी सार्वजनिक वाहनांचा किंवा सायकलचा वापर करून पर्यावरण संरक्षण करण्यासाठी आपले अनमोल योगदान दिले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**21) डॉ. गोपाळराव पाटील साहेबांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर**

लातूर: दिनांक ११ ऑक्टोबर (प्रतिनिधी) राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर यांच्या सहकार्याने शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ. गोपाळराव पाटील साहेब यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी व विद्यार्थी यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ५१ पिशव्या रक्ताचे संकलन झाले.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, आयक्यएसी को-ऑर्डिनेटर डॉ. अभिजित यादव, कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. दिपक वेदपाठक, प्रा. रंजीत शिंदे, प्रा. युवराज शिखरे, डॉ. नितीन भालके, डॉ. स्वाती फेरे, प्रा. शुभम जाधव, श्री. महेश शिंदे, श्री. गोविंद जाधव तसेच वैद्यीय महाविद्यालयाचे डॉ. शिवकांता बमणे, डॉ.

सुमित कयटलवार, डॉ. सिध्देश्वर चौधरी, श्री. बी.डी. सुर्यवंशी, श्री. गौरीशंकर स्वामी, श्री. हणमंत देढे, सामाजिक कार्यकर्ते श्री. बळीराम कांबळे, श्री. दिनेश सुर्यवंशी, यांचे मोलाचे सहकार्य.

**22) लातूर परिसरात "स्वच्छ भारत अभियान"**

**19 ऑक्टोंबर 2022** रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लातूर परिसरात प्लास्टिक जनजागृती रॅली काढून "स्वच्छ भारत अभियान" राबविण्यात आले. या कार्यक्रमात शहरातील गंजगोलाई भागात व परिसराच्या दुकानातील प्लास्टिक जमा केले. व ते महाविद्यालयात महानगरपालिकेची घंटागाडी आल्यावर त्यांच्याकडे सुपूर्द केले. सदर अभियान राबविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी परिश्रम घेतले.

**23) स्व.इंदिरा गांधी पुण्यतिथी व स्व. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंतीनिमित्त सांप्रदायिक एकात्मता कार्यक्रम**

दिनांक 31 ऑक्टोबर 2022 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात स्व.इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व भारताचे लोहपुरुष स्व. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय एकता दिना निमित्त सांप्रदायिक एकात्मतेची सामुहिक शपथ घेण्यात आली व रासेयो स्वयंसेवकांची रॅली काढण्यात आली. याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत सर व प्रा. सोमदेव शिंदे सर तसेच ग्रंथपाल प्रा. मस्के सर, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**24) राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिरात शाहू महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक संचीत राजेंद्र पाटील चा सहभाग**

**दिनांक 02 ते 07 नोव्हेंबर 2022** दरम्यान महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चिखलदरा येथे आयोजित राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर संपन्न झाले. या साहसी क्रीडा शिबिरात शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वयंसेवक संचीत राजेंद्र पाटील याने सक्रिय सहभाग नोंदविला. त्याबद्दल प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी तीचे अभिनंदन अभिनंदन केले.

**25) शाहू महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्व निवड चाचणी शिबीर**

**दिनांक 21 नोव्हेंबर 2022 रोजी (प्रतिनिधी):** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे दि. 19 ते 28 डिसेंबर 2022 दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी दिनांक 21 नोव्हेंबर 2022 रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) , लातूर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा स्तरीय निवड चाचणी शिबीर संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या निवड चाचणीत लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील एकूण 48 स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. त्यातून राज्यस्तरीय शिबिरासाठी 25 स्वयंसेवकांची निवड करण्यात आली. यावेळी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, रासेयो चे जिल्हा समन्वयक डॉ. कल्याण सावंत, क्षेत्रीय समन्वयक डॉ. संजय गांधी, परीक्षक डॉ. केशव आलगुले, प्रा. विजय दळवी, प्रा. विजय गवळी, प्रा. शुभम जाधव, डॉ. स्वाती फेरे इ. उपस्थित होते.

**26) शाहू महाविद्यालयातील हेल्थ केअर सेंटर येथे आरोग्य तपासणी शिबीर**

दिनांक 21 नोव्हेंबर 2022 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील हेल्थ केअर सेंटर मध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिरात हेल्थ केअर सेंटर च्या विभागप्रमुख डॉक्टर स्वाती फेरे यांनी महाविद्यालयातील कर्मचारी यांची तपासणी केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, सामाजिक कार्य विभागाचे प्राध्यापक शुभम जाधव यांनी उपस्थित राहुन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले.

**27) भारतीय संविधान दिवस साजरा**

दिनांक 26/11/2022 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्तविद्यमाने वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करत "भारतीय संविधान दिवस" साजरा करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात भारतीय संविधानातील सर्व मूल्यांचीजोपासना करण्यासाठी सामुहिक शपथ घेतली. यावेळी परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, कार्यालयीन अधीक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, प्रा. माधव शेळके, प्रा.दीपक वेदपाठक, प्रा. विजय दळवी व मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ग्रंथपाल श्री.एस.बी.मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री. पांडुरंगभोगिले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**28) राजर्षी शाहू महाविद्यालयात 'मतदार नोंदणी शिबीर'**

**दिनांक 30 नोव्हेंबर ते 1 डिसेंबर 2022** मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२३ अंतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालयात राज्यशास्त्र व रासेयो विभागाच्या वतीने 'मतदार नोंदणी शिबीर' सुरु आहे. दिनांक ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२२ दरम्यान सकाळी १०:०० ते सायंकाळी ४:०० या वेळेत हे शिबीर चालू असणार आहे. ज्यांचे वय वर्षे १८ पूर्ण झाले आहे व मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यात आलेले नाही त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी 'वोटर हेल्पलाईन ॲप' (Voter Helpline App) च्या माध्यमातून सदर नोंदणी केली जात आहे. "मतदान करने हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे अधिकार आणि कर्तव्य आहे. म्हणून १८ वय वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाने मतदार यादीत नाव नोंदणी करुन घ्यावे." असे आवाहन प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांनी केले आले आहे. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. संदीपान हाडुळे, प्रा. उज्ज्वला बगदूरे, प्रा. युवराज शिखरे, प्रा. रहीम शेख, प्रा. राहुल मोरे, प्रा. कृष्णा पांचाळ, प्रा. दिपीका स्वामी, प्रा. पल्लवी माने, प्रा. माया जाधव व महसूल विभाग, लातूर येथील मतदान नोंदणी अधिकारी श्री जी. पी. दहिफळे, श्री. नागेश मुळे इत्यादी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

**29) जागतिक एड्स दिनानिमित्त 'रेड रिबन' ची प्रकृती साकारत जनजागृती रॅलीचे आयोजन**

दिनांक 1 डिसेंबर 2022 रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त शिव छत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थी स्वयंसेवकांमार्फत 'रेड रिबन' ची प्रकृती साकारत एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली. 'संयम पाळा, एड्स टाळा', 'एड्स है एक जान लेवा बीमारी, इसे मिटाना जिम्मेदारी हमारी' अशा घोषणा देत ही रॅली काढत जनजागृती करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, यांनी एच.आय.व्ही. रोगाबाबत सावधानता बाळगणे

आवश्यक आहे. असे मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. स्वाती फेरे यांनी एचआयव्ही रोगाबाबत जनजागृती साठी व सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**30) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 66 वे महापरिनिर्वाण दिनानिमित्त शाहू महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम**

दिनांक 6 डिसेंबर 2022 रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्था संचालित राजश्री शाहू महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 66 वे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी म्हटले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने जनहिताच्या उत्कर्षाचा ध्यास घेणारे महामानव होते. त्यांनी संत तुकाराम महाराज, संत कबीर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विचाराने प्रेरित होऊन अस्पृश्य निवारण्यासाठी चे महत्तम कार्य तर केलेच, त्याचबरोबर समाजातील सर्वांगीण दृष्टीने वंचित असणाऱ्या, स्त्री, शेतकरी, मजूर, आलूते-बलुतेदार इ. सामान्य घटकांच्या उन्नतीसाठी कार्य केले. बाबासाहेबांनी केलेले कार्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केले तर त्यांना अभिवादन केल्याचे सार्थक होईल."

या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. पल्लवी नवगिरे व विद्यार्थी सम्यक कोल्हे यांनीही प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दीपक वेदपाठक, ग्रंथपाल प्रा. एस. बी. मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री पांडुरंग भोगिले, श्री निजाम शेख, कार्यालयीन अधीक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, प्रा. राजेंद्र शास्त्री, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इ. कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची उपस्थिती होती.
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सावंत यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले.

**31) वृक्षारोपण**

दिनांक 23 डिसेंबर 2022 रोजी वेळ अमावस्या निमित्त राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक विजय अशोक गवळी यांनी कोळपा येथील नांदेड रोड च्या कडेला श्री खराबे नागनाथ विश्वनाथ यांच्या शेतात 'चिंच' या झाडाच्या वृक्षारोपाची लागवड केली.

**32) शाहू महाविद्यालयात विद्यार्थ्यांना COVID -19 चा बूस्टर डोस**

दिनांक 29 डिसेंबर 2022 रोजी कोरोना व्हायरस पासून बचावात्मक सुरक्षा बाळगण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थ्यांना COVID -19 चा बूस्टर डोस देण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, म.न.पा. लातूर येथील आरोग्य केंद्राचे कर्मचारी, महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इत्यादींनी सदर अभियान राबविण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**33) पर्यावरण शिक्षण वह्यांमधील वृक्षारोप लागवडीचे फोटो कात्रणे काढण्यासाठी स्वयंसेवकांचेयोगदान**

**दिनांक ३० डिसेंबर 2022** शै. वर्ष 2021-22 मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'पर्यावरण शिक्षण व जल सुरक्षा' या विषयातील प्रकल्प वही मध्ये 'एक विद्यार्थी, एक झाड' उपक्रमाचे जे फोटो लावले होते. ते फोटो वेगळे

करण्यासाठी दिनांक ३० डिसेंबर 2022 रोजी कनिष्ठ महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या 15 विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या सूचनेनुसारसदर कार्यात योगदान दिले.

**34) सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'मुलगा हवा, पण मुलगी का नको ? विषयावर पथनाट्य सादरीकरण**

**दिनांक 03 जानेवारी, 2023 रोजी** शिव छत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्तविद्यमाने स्त्री शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या आद्य शिक्षिका व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी"मुलगा हवा, पण मुलगी का नको ?" या विषयावर स्त्री भ्रूण हत्या व हुंडाबळीप्रथा रोखण्यासाठी जनजागृती पर पथनाट्य सादरीकरण केले. 'सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या नेतृत्वाखाली अनेक समस्यांना सामोरे जाऊन सुद्धा त्याकाळी महिलांना व मुलींना शिक्षण देत ज्ञानदानाचे कार्य केले'. असे विचार उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. 'टिफिन टाईम' चित्रपटाचे दिग्दर्शक म्हाल्साकांत कौसदीकर, निर्माते साहिल वास्टे, कलाकार विपुल साळुंखे, योगेश कुलकर्णी, सहाय्यक निर्देशक अजय शिंदे, कॉसमॉस अकॅडमीचे संचालक अजय मस्के यांनी यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. व 6 जानेवारी रोजी प्रदर्शित होणाऱ्या 'टिफिन टाईम' या मराठी चित्रपटाला पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, ग्रंथपाल, डॉ. एस.बी. मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री. पांडुरंगभोगिले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**35) राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबिरात विद्यार्थी स्वयंसेवक व कार्यक्रमाधिऱ्यांचा सहभाग**

दिनांक 10 ते 12 जानेवारी 2023 दरम्यान साने गुरुजी स्मारक माणगाव जिल्हा रायगड (माणगाव रेल्वे स्टेशन) येथे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे व शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई यांच्या द्वारे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांसाठी"राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिर" आयोजित करण्यात आले. या राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबिरात राजर्षी शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक अनिकेत बालाजी गायकवाड, शितोळे सूर्यकिरण सिद्धेश्वर, पटेल रिजा इस्माईल या तीन स्वयंसेवकांनीव कार्यक्रमाधिकारी तसेच लातूर जिल्हा समन्वयक म्हणून प्रा. विजय अशोक गवळी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तत्पूर्वी दिनांक 08 जानेवारी 2023 रोजी रात्री 8:00 वा. लातूर येथुन रायगड कडे प्रस्थान केले व दिनांक 09 जानेवारी रोजी शिबिराच्या पहिल्या दिवशी 'रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. या शिबिरात नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.

**36) राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभाग (दि. ११ ते १७ जानेवारी २०२३)**

युवा व खेल मंत्रालय नवी दिल्लीव कर्नाटक शासन यांच्या संयुक्तविद्यमाने धारवाड हुबळी येथे आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाचा स्वयंसेवक श्री. मयुर भिसे या विद्यार्थ्याची निवड होऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे प्रतिनिधीत्व करत श्री. मयुर भिसे यांनी या राष्ट्रीय युवा महोत्वसामध्ये उत्फ्सुर्त सहभाग नोंदवला.

**37) राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन 2023 साठी शाहू महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेविका कु.कदम निकिता हिचा सहभाग**

दिनांक 17 ते 26 जानेवारी, 2023 या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यानगरी सांताक्रुज (पूर्व) मुंबई येथे आयोजित

राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर व दिनांक 26 जानेवारी 2023 रोजी शिवाजी पार्क मुंबई येथे प्रजासत्ताक दिन संचलनात राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थी स्वयंसेविका कु. कदम निकिता संजय हिने सक्रिय सहभाग नोंदविला. त्याबद्दल प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी तीचे अभिनंदन अभिनंदन केले.

**38) आझादी की मशाल रॅली चे शाहू महाविद्यालयात भव्य स्वागत दिनांक 24 जानेवारी 2023**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सर्व महाविद्यालयातून आझादी की मशाल रॅली हा कार्यक्रम हाती घेतला. सदर रॅली राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे दिनांक 24 जानेवारी 2023 रोजी दुपारी 1:00 वाजता पोहचली. राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांनीव महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, रासेयो +2 स्तर चे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, यांनी रॅलीत सहभागी झालेल्या वेगवेगळ्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांचे व आजादी च्या मशाल चे भव्य स्वागत केले.

**39) प्रजासत्ताक दिनानिमित्त रोसेयो स्वयंसेवकांचेपथसंचलन**

दिनांक 26 जानेवारी 2023 रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकां द्वारे 'पथ संचलन' करण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**40) मौजे शिऊर गावात कार्यक्रमाधिकारी यांची शिबीर पूर्व तयारी साठी भेट**

दिनांक 30 जानेवारी 2023 रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा.सोमदेव शिंदे यांनी मौजे शिऊर, ता.जि. लातूर या गावात जाऊन विशेष युवक शिबीर पूर्व तयारी करण्यासाठी भेट दिली व सदर गावातील सरपंच श्री सचिन सूर्यवंशीआणि गावातील नागरिकांशी संवाद साधत गावातील नागरिकांचा प्रतिसाद जाणून घेतला.

**41) शिवजयंती निमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबीर संपन्न लातूर दिनांक 11.02.2023**

छत्रपति शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने येणाऱ्या शिवजयंतीनिमित्त शनिवार दिनांक 11 फेब्रुवारी 2023 रोजी महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन शि.छ.शि. संस्थेचे सदस्य डॉ. शेखर गरड व सौ सुरेखा गरड यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते. या भव्य रक्तदान शिबिरात 104 रक्तपिशव्यांचे संकलन झाले. शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीला फक्त डीजे, डॉल्बीची रॅली न काढता शिवाजी महाराजांच्या कार्याचा प्रचार प्रसार होईल यासाठी भाषण व वक्तृत्व स्पर्धा रक्तदान शिबिरे आणि विभिन्न सामाजिक प्रबोधनासारखे उपक्रमांचे आयोजन केले जावे. अशा प्रकारचे आवाहन प्राचार्य डॉक्टर महादेव गव्हाणे यांनी केले.

यावेळी डॉ. गणेश पन्हाळे, डॉ. हर्षवर्धन राऊत,ॲड. शिवकुमार जाधव, ॲड. भाई उदय गवारे, डी. एस. पाटील, प्रमोद साळुंके, भगवान माकणे, धनंजय शेळके, शहाजी पवार, अभिमन्यू जगदाळे, योगेश शिंदे, दत्ता मोटे, प्रतीक जाधव आदींची उपस्थिती होती.

सदर रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. स्वाती फेरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, माऊली ब्लड बँकेचे डॉ.सोनाली केंद्रे, पी.आर. ओ. बालाजी जाधव, संदीप ढोपरे, कल्पना कोंपले, बालाजी नरहरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**42)(अ) शाहू महाविद्यालयाचे रासेयो च्या विशेष युवक शिबीराचे उद्‌घाटन**

**राष्ट्र सेवेत एन.एन.एस. च्या स्वयंसेवकांचेअमूल्य योगदान आहे.**

**- अभिनव गोयल (मुख्य कार्यकारी अधिकारी,जि. प. लातूर)**

दिनांक 13 फेब्रुवारी 2023 लातूर प्रतिनिधी: "भारताच्या विकासासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पाणी आडवा, पाणी जिरवा मोहिम द्वारा जलसंवर्धन, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, मुलगी वाचवा आणि मुलगी शिकवा, महिला उद्योग व सबलीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामस्वच्छता, बाल विवाह समस्या आणि प्रतिबंधात्मक उपाय, शेती, ग्रामोद्योग व शैक्षणिक विकास करण्यासाठी भारतत सरकार द्वारा आयोजित नऊ सूत्री शासकीय योजनांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक युवती गावा - गावात जाऊन लोकांसोबत संपर्क साधत वर्षभर विविध उपक्रम राबवत जनजागृती करतात. म्हणून राष्ट्र सेवेत एन.एन.एस. च्या स्वयंसेवकांचे अमूल्य योगदान आहे." असे विचार जिल्हा परिषद लातूर चे मुख्य कार्यकारी श्री अभिनव गोयल यांनी युवकांचाध्यास ग्राम-शहर विकास अभियानासाठी विशेष युवक श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे शिऊर ता.जि. लातूर येथे "युवकांचाध्यास ग्राम-शहर विकास" अभियानासाठी दिनांक 13 ते 19 फेब्रुवारी 2023 दरम्यान विशेष युवक श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शि.छ.शि.संस्थेचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव पाटील हे होते.

डॉ गोपाळराव पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, "संतांनी व महापुरुषांनी जो कृतिशील मार्ग दाखविला त्याचा सर्वांनी अवलंब केला पाहिजे. गावाच्या विकासासाठी कुठल्याही कामाची लाज बाळगु नये. सुशिक्षित व चांगल्या व्यक्तिंच्या संपर्कात राहूनच लोकांचे मतपरिवर्तन होते." लोकमत वृत्तपत्राचे संपादक श्री धर्मराज हल्लाळे, मांजरा सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, गटविकास अधिकारी श्री तुकाराम भालके आदींची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी ही शिबिरातील विद्यार्थी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. शिबिराच्या उद्घाटना पूर्वी वृक्षारोपण जनजागृती दिंडी रॅली काढण्यात आली.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, सामाजिक कार्यविभागाचे प्रा. शुभम जाधव, शिऊर गावातील सरपंच प्रा. श्री. सचिन सूर्यवंशी, उपसरपंच श्री. विलास सूर्यवंशी, पोलीस पाटील श्री उद्धव पाटील, शालेय समितीचे अध्यक्ष श्री. सतिश सूर्यवंशी, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री. श्रीकांत शिरसाठ व मोठ्या संख्येने रोसेयो चे विद्यार्थी स्वयंसेवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश रोडिया व प्रा. विजय गवळी यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले.

दिनांक 13 ते 19 फेब्रुवारी 2023 दरम्यान सुरू असलेल्या सात दिवसीय विशेष युवक समसंस्कार शिबिरा दरम्यान 'वृक्षारोपण व जनजागृती रॅली', 'ग्राम स्वच्छता व संत गाडगेबाबा आणि युवकांची भूमिका', ' अंधश्रद्धा निर्मूलन', 'पशु चिकित्सा शिबीर', 'लढा व्यसनमुक्तीचा', 'काव्य मैफिल', 'महिला मेळावा', 'बालविवाह समस्या आणि

उपाय', 'पर्यावरण संवर्धन परिसंवाद, 'शेतकरी मेळावा', 'राष्ट्रीय एकात्मता व आजचा युवक', 'गजल गायन', 'आरोग्य शिबिर', 'सायबर सुरक्षा', 'सांस्कृतिक कार्यक्रम' , 'जलसंवर्धन', 'महिला सबलीकरण' अशा अनेक विषयांवर आधारित व्याख्यान, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत व शिऊर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

शिबिराच्या समारोप समारंभाचे अध्यक्ष डॉ.पी.आर.देशमुख, प्रमुख पाहुणे म्हणून लातूर चे जिल्हाधिकारी मा. श्री बी.पी. पृथ्वीराज, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील रासेयो चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, लातूर विभाग राष्ट्रीय सेवा योजना + 2 स्तर चे विभागीय समन्वयक डॉ. संदीप जगदाळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**43)(ब)शाहू महाविद्यालयातील रा.से.यो च्या विशेष युवक शिबीराचे समारोप संपन्न**

**बालविवाह रोखण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनीप्रबोधन करावे.**

**- रासेयो चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी (स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड)**

दिनांक 19 फेब्रुवारी 2023 लातूर (प्रतिनिधी): महाराष्ट्र हा प्रगतशील व अनेक क्षेत्रांत पुढारलेला राज्य आहे पण तरीही बालविवाह च्या बाबतीत महाराष्ट्राचा नंबर सातव्या क्रमांकावर आहे. शिक्षणाच्या वयातच होणारे बालविवाह रोखण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रबोधन करावे. असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील रासेयो चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी शिऊर येथे राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे आयोजित विशेष युवक शिबीराच्या समारोप समारंभाप्रसंगी व्यक्त केले. यावेळी समारोप समारंभाचे अध्यक्ष डॉ. पी.आर.देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूर द्वारा संचलित राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "युवकांचाध्यास, ग्राम-शहर विकास" अभियानासाठी दिनांक 13 ते 19 फेब्रुवारी 2023 दरम्यान मौजे शिऊर, ता. जिल्हा लातूर येथे सात दिवसीय विशेष युवक श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी या शिबिराचे उद्घाटन वृक्षारोपण जनजागृती रॅली काढत जिल्हा परिषद लातूर चे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक लोकमत वृत्तपत्राचे संपादक श्री धर्मराज हल्लाळे हे होते.

दिनांक 13 ते 19 फेब्रुवारी 2023 दरम्यान संपन्न झालेल्या सात दिवसीय विशेष युवक समसंस्कार शिबिरा दरम्यान डॉ.भीमराव पाटील यांनी 'ग्राम स्वच्छता व संत गाडगेबाबा आणि युवकांची भूमिका' अनिस चे राज्य प्रधान सचिव श्री माधव बावगे यांनी' अंधश्रद्धा निर्मूलन कार्यशाळा' श्री दगडू लोमटे यांनी 'लढा व्यसनमुक्तीचा' डॉ.शुभदा लोहिया यांनी 'बालविवाह समस्या आणि उपाय' श्री सुपर्ण जगताप यांनी 'पर्यावरण संवर्धन परिसंवाद' सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्री सय्यद रहेमान व लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे यांनी 'राष्ट्रीय एकात्मता व आजचा युवक', न्यायाधीश श्रीमती अनुश्री गायकवाड यांनी 'महिला मेळावा' रेशीम विकास अधिकारी श्री एस.बी. वराट यांनी 'शेतकरी मेळावा' प्रा. मनोज बिराजदार यांनी 'सायबर सुरक्षा' या विषयांवर मार्गदर्शन केले. या शिबिरा दरम्यान घेण्यात आलेल्या आरोग्य शिबीरात ग्रामस्थांचे डोळे तपासणी, दंत तपासणी करत मोफत औषधोपचार करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थी स्वयंसेवकांचे हिंदवी स्वराज्य, शिव प्रताप, गणिमी कावा, शिव शंभो, छावा, शिव छत्रपती असे सहा ग्रुप च्या माध्यमातून 'ग्रामस्वच्छता', 'बेटी बचाव, बेटी पढाव', 'काव्य मैफिल, 'गजल गायन', 'आरोग्य शिबिर', 'सांस्कृतिक कार्यक्रम' , 'पाणी आडवा, पाणी जिरवा अभियानासाठी जलसंवर्धन उपक्रम', 'महिला सबलीकरण' या विषयांवर

आधारित सांस्कृतिक, प्रबोधनात्मक व श्रमदान कार्यक्रम ही राबविण्यात आलेत. शिबिरात विद्यार्थी स्वयंसेवकांना राष्ट्रीय एकात्मता, सेवाभाव, संगठन, समय नियोजन, नेतृत्व विकास व व्यक्तिमत्त्व विकासाची शिकवन देण्यात आली.

सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी शिबिराचे संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक जयराज गंगणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, शिऊर गावातील सरपंच प्रा. श्री सचिन सूर्यवंशी, उपसरपंच श्री विलास सूर्यवंशी, पोलीस पाटील श्री उद्धव पाटील, ग्रामसेवक सौ.आर.बी. भारती, शालेय समितीचे अध्यक्ष श्री सतिश सूर्यवंशी, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री श्रीकांत शिरसाठ, ग्रामपंचायतीचे आणि सोसायटी चे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

**44) राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये सहभाग (दि. २३ फेब्रुवारी ते १४ मार्च २०२३)**

दि. २३ फेब्रुवारी ते १४ मार्च दरम्यान युवा व खेल मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे राष्ट्रीय एकात्मता शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरामध्ये महाविद्यालयाचा स्वयंसेवक श्री महेश कलमे याची निवड होऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करत उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

**45) वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभात उत्कृष्ट स्वयंसेवकांचा गौरव**

दिनांक 27 फेब्रुवारी 2023 रोजी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभात वर्षे 2022-23 मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत नियमित कार्यक्रमात व विशेष युवक शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन स्वयंसेवकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना चा स्वयंसेवक शेख अमीर, व कुकडे ऋतुराजे यांना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते 500-500 रुपये बक्षीस वितरण करण्यात आले.

**46) शाहूत पाच दिवसीय "लातूर जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर" संपन्न दिनांक 27 ते 31 मार्च 2023**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय ( स्वायत्त ), लातूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्तविद्यमाने दिनांक 27 ते 31 मार्च 2023 या कालावधीत पाच दिवसीय "लातूर जिल्हास्तरीय युवक - युवती नेतृत्व विकास शिबीर" महाविद्यालयात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन लातूर वृक्ष समन्वय समिती चे समन्वयक श्री सुपर्ण जगताप यांनी केले. शिबिरात डॉ. भीमराव पाटील यांनी 'व्यक्तिमत्व विकासातील पैलू', सेवा निवृत्त पोलीस निरीक्षक श्री सय्यद रेहमान यांनी 'स्त्री-पुरुष समानता काळाची गरज', श्री सुपर्ण जगताप यांनी 'पर्यावरण संवर्धन समस्या व उपाय', प्रा. मंजुषा शिंदे यांनी 'सायबर क्राईम', डॉ. सदाशिव दंदे यांनी 'आत्मनिर्भर भारत आणि युवक', डॉ. मच्छिंद्र खंडागळे यांनी 'धर्मनिरपेक्ष भारत', डॉ. धनंजय गुट्टे यांनी 'वैज्ञानिक दृष्टिकोन', डॉ. दीपक वेदपाठक यांनी 'भारतातील ललित कला व सांस्कृतिक वारसा', आशा अनेक मान्यवरांनी सदर वेगवेगळ्या विषयांवर आपल्या व्याख्यानातून उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तर राजर्षी शाहू महाराज जन्म शताब्दी वर्षानिमित्त 'जलसंवर्धन' या विषयावर विद्यार्थी परीसंवादात मार्गदर्शन केले. या पाच दिवसीय शिबिरात दररोज सकाळी योगसत्र घेण्यात आले. व संध्याकाळी 'व्यक्तिमत्त्व विकास व नेतृत्व विकास संदर्भातकाही गटचर्चा खेळांचे' आयोजन करण्यात आले. शिबिरात लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील व राजर्षी शाहू कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातून एकूण 100 स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. शिबिराच्या समारोप समारंभात

दयानंद महाविद्यालयातील संगीत विभागाचे प्राध्यापक व लातूर विभागातील राष्ट्रीय सेवा योजना चे विभागीय समन्वयक डॉ. संदीप जगदाळे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या समारोप समारंभात शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर चे सहसचिव मा. गोपाळ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराच्या उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी मार्गदर्शन केले. या शिबिराला यशस्वी रित्या संपन्न करण्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व शिबीर संयोजक लातूर जिल्ह्यातील रासेयो समन्वयक डॉ. कल्याण सावंत, कार्यक्रमाधिकारी डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय अशोक गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इतर प्राध्यापक अमोल लांडगे, डॉ. शिवराज काचे, प्रा. शुभम जाधव, प्रा. पुजा मस्के पाटील, इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**

"